आता दै. लातूर प्रभात इंटरनेटवर वाचा एका क्लिकवर www.elaturprabhat.in




# दैनिक लातूर प्रभात

E-mail :- laturprabhat@gmail.com
मुख्य संपादक : रघुनाथ बनसोडे मो.नं.८८३०२ ५०६४५,
RNI No.: - MAHMAR/2017/72894 ● वर्ष ८ वे ● अंक ३३१ वा ● बुधवार दि. ११ जून २०२५ ● किंमत २ रूपया ● पाने ४ ●




## वाढदिवसाचे औचित्य साधून जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांनी केला नेत्रदानाचा संकल्प

लातूर, (जिमाका): जागतिक दृष्टी दान दिन आणि आपला वाढदिवस यांचे औचित्य साधून जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांनी नेत्रदानाचा संकल्प करून एक प्रेरणादायी पाऊल उचलले. जिल्हा शल्य चिकित्सक कार्यालय आणि जिल्हाधिकारी कार्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने लातूरच्या दयानंद सभागृहात आयोजित नेत्रदान संकल्प अभियान कार्यक्रमात त्यांनी स्वतःच्या स्वाक्षरीने संकल्प पत्र भरून नेत्रदानाचा दृढनिश्चय जाहीर केला. यावेळी त्यांनी उपस्थित महसूल अधिकारी, कर्मचारी यांनी या कार्यात सहभागी होण्याचे हृद्य आवाहन केले.

जिल्हा नेत्र शल्य चिकित्सक डॉ. पाठक यांनी नेत्रदानाचे महत्त्व, त्याची गरज आणि कार्यपद्धती याबाबत उपस्थितांना सखोल मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाला क्षेत्रीय अधिकारी श्री. जयंत क्षीरसागर, नेत्र चिकित्सा अधिकारी श्री. आर. पी. वाघमारे, श्री. संकेत लंपाटे, श्री. विनायक सोनटक्के आणि लातूर जिल्हा अंधत्व नियंत्रण समितीचे सर्व सदस्य उपस्थित होते.

या अभियानामुळे समाजात नेत्रदानाबाबत व्यापक जनजागृती होऊन अनेकांना प्रेरणा मिळेल, असा ठाम विश्र्वास श्रीमती ठाकूर-घुगे यांनी व्यक्त केला.

## महाडीबीटी पोर्टलवर शिष्यवृत्ती अर्ज भरण्यासाठी १५ जूनपर्यंत मुदत

लातूर (जिमाका): शिष्यवृत्तीसाठी सन २०२३-२४ साठी रि-अप्लाय आणि सन २०२४-२५ शैक्षणिक वर्षासाठी नवीन शिष्यवृत्ती अर्ज भरण्यासाठी महाडीबीटी पोर्टल सुरू झाले आहे. जिल्ह्यातील शासनमान्य, अनुदानित, विनाअनुदानित आणि कायम विनाअनुदानित महाविद्यालयांमध्ये प्रवेश घेतलेल्या अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांना भारत सरकार शिष्यवृत्ती, शिक्षण शुल्क व परीक्षा शुल्क फ्रिशीप, राजर्षी शाहू महाराज गुणवत्ता शिष्यवृत्ती आणि व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी निर्वाह भत्ता योजनेचा लाभ घेता येईल.

८ जानेवारी २०१९ रोजीच्या शासन निर्णयानुसार अभ्यासक्रमांचे शिक्षण शुल्क, विद्यापीठाद्वारे आकारले जाणारे इतर शुल्क आणि शैक्षणिक विभाग तसेच शासकीय यंत्रणांकडून घ्यावयाची मंजुरी याची जबाबदारी संबंधित महाविद्यालयांचे प्राचार्य आणि लिपिक कर्मचारी यांच्यावर आहे. महाविद्यालयांनी समान संधी केंद्रामार्फत विद्यार्थ्यांच्या अडचणी सोडवाव्यात आणि शिष्यवृत्ती मार्गदर्शन शिबिरांचे आयोजन करावे.

सर्व प्राचार्य, कर्मचारी आणि विद्यार्थ्यांनी अर्ज अचूक भरून १५ जून २०२५ पूर्वी ऑनलाईन सादर करावेत. अर्ज प्रलंबित राहिल्यास संबंधित महाविद्यालयाचे प्राचार्य आर्थिक जबाबदारीस पात्र राहतील, असे लातूरचे समाज कल्याण सहायक आयुक्त यांनी स्पष्ट केले.

## कन्यादान योजनेसाठी सामूहिक विवाह सोहळ्यांचे प्रस्ताव मागवले

लातूर, (जिमाका): छत्रपती संभाजीनगर येथील एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्पामार्फत सन २०२५-२६ या वित्तीय वर्षात अनुसूचित जमातीच्या लाभार्थ्यांसाठी कन्यादान योजनेअंतर्गत सामूहिक विवाह सोहळ्यांचे आयोजन करण्यासाठी स्वयंसेवी संस्थांकडून प्रस्ताव मागवण्यात आले आहेत. या योजनेचा उद्देश विवाहातील अनुचित प्रथा रोखणे आणि सहभागी दाम्पत्यांना आर्थिक सहाय्य प्रदान करणे आहे.प्रस्ताव विहित नमुन्यातील अर्जासह (कार्यालयात उपलब्ध) सादर करावेत. संस्थांनी विवाहाचे ठिकाण, तारीख आणि वर-वधूंच्या सत्यप्रत अर्जासह प्रस्ताव पाठवावेत. अर्जाचा नमुना शासकीय सुट्टी वगळता कार्यालयीन वेळेत उपलब्ध आहे. पूर्ण भरलेले प्रस्ताव ३१ ऑगस्ट २०२५ पर्यंत कार्यालयात दाखल करणे आवश्यक आहे. मुदतीनंतर प्राप्त प्रस्तावांचा विचार केला जाणार नाही.

योजनेची अंमलबजावणी, कालावधी आणि लक्षांक बदल करण्याबाबतचे सर्व अधिकार प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, छत्रपती संभाजीनगर यांच्याकडे राखीव आहेत, असे प्रकल्प अधिकारी चेतना मोरे यांनी कळवले

# शस्वी होण्यासाठी मानसिक तणावाचे योग्य व्यवस्थापन गरजेचे-जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे




लातूर (जिमाका): आजच्या वेगवान जीवनात मानसिक तणाव हा प्रत्येकाच्या आयुष्याचा अविभाज्य भाग बनला आहे. मात्र, या तणावाचे योग्य व्यवस्थापन केल्याशिवाय यशस्वी होणे शक्य नाही, असे स्पष्ट मत जिल्हाधिकारी श्रीमती वर्षा ठाकूर-घुगे यांनी व्यक्त केले. 'टेक-वारी' उपक्रमांतर्गत जिल्हाधिकारी कार्यालयातर्फे आयोजित 'मनाची अमर्याद शक्ती आणि तणावमुक्ती' या कार्यशाळेच्या उद्घाटनप्रसंगी त्या बोलत होत्या. मानसिक तणावाचे प्रभावी व्यवस्थापन याविषयी मार्गदर्शनासाठी कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते.

या कार्यक्रमाला अपर जिल्हाधिकारी शिल्पा करमरकर, निवासी उपजिल्हाधिकारी केशव नेटके, प्रमुख मार्गदर्शक डॉ. दत्ता कोहिनकर तसेच महसूल कर्मचारी संघटना आणि तलाठी संघटनेचे पदाधिकारी उपस्थित होते. जिल्ह्यातील महसूल विभागातील अनेक अधिकारी आणि कर्मचारी या उपक्रमात सहभागी झाले.

मानसिक तणावाचा अतिरेक आरोग्यासाठी हानिकारक ठरतो; परंतु योग्य व्यवस्थापनाद्वारे हाच तणाव व्यक्तीच्या क्षमता वृद्धिंगत करण्यासाठी उपयुक्त ठरू शकतो, असे जिल्हाधिकारी श्रीमती ठाकूर-घुगे यांनी नमूद केले. आपल्यावर सोपविलेली जबाबदारी तणावमुक्त राहून पूर्ण क्षमतेने पार पाडण्याचे कौशल्य विकसित करणे आवश्यक आहे. गतिमान आणि अचूक कामकाजासाठी आग्रही राहिल्यास तणावाची परिस्थिती उद्भवत नाही. त्यामुळे प्रत्येक अधिकारी आणि कर्मचाऱ्याने कामाचे सुयोग्य नियोजन करून प्रत्येक काम अचूकपणे पूर्ण करण्यासाठी प्रयत्न करावेत, असे त्यांनी सांगितले. ही कार्यशाळा तणावमुक्तीच्या दृष्टीने उपयुक्त ठरेल, असा विश्र्वासही त्यांनी व्यक्त केला.

आपण जसा विचार करतो, तसे परिणाम आपल्या शरीरावर दिसतात. सतत नकारात्मक विचार किंवा तणावाखाली जगण्याने मानसिक आरोग्य बिघडते. त्यामुळे प्रत्येकाने सकारात्मक दृष्टिकोन ठेवून परिस्थितीला सामोरे जावे, असे सुप्रसिद्ध व्याख्याते डॉ. दत्ता कोहिनकर यांनी मानसिक तणाव व्यवस्थापनावर मार्गदर्शन करताना सांगितले. तणावमुक्तीसाठी नियमित व्यायाम, सकारात्मक विचार आणि स्वतःची काळजी घेणे यासारख्या सवयी अंगीकारण्याचा सल्ला त्यांनी दिला. विविध उदाहरणांद्वारे त्यांनी तणाव व्यवस्थापनाच्या प्रभावी पद्धती स्पष्ट केल्या.

कार्यक्रमाच्या प्रारंभी अपर जिल्हाधिकारी शिल्पा करमरकर यांनी प्रास्ताविक केले, तर उद्धव फड यांनी सूत्रसंचालन केले.

## फळबागेची शेती फायदयाची ठरण्यासाठी खात्रीशीर, निरोगी रोपांची निवड आवश्यक आयसीआरचे वरीष्ठ शास्त्रज्ञ डॉ. बसना गौड

लातूर प्रतिनिधी: फळबागेची शेती फायदेशीर ठरायची



असेल तर त्यासाठी रोपांची निवड अत्यंत महत्वाची ठरते त्यामुळे खात्रीशीर आणि निरोगी रोपाची लागवड करावी असा सल्ला सोलापूर येथील राष्ट्रीय डांळीब संशोधन केंद्र येथे कार्यरत असलेले आयसीआरचे वरीष्ठ शास्त्रज्ञ डॉ. बसना गौड यांनी दिला आहे. केंद्रीय कृषी मंत्रालयाच्या वतीने लातूर येथील मांजरा चॅरीटेबल संचलीत कृषी विज्ञान केंद्राच्या माध्यमातून लातूर जिल्हयात २९ मे ते १२ जून दरम्यान विकसीत कृषी संकल्प अभियान राबविण्यात येत आहे. सोलापूर येथील डांळीब संशोधन केंद्रातील वरीष्ठ शास्त्रज्ञ डॉ. रामनिवास (फळबाग), डॉ.बसना गौड (किटकशास्त्र), डॉ.चंद्रकांत औवचारे (फळबाग) आणि डॉ. मल्लीकार्जून एच (किटकशास्त्र) यांच्यासह मांजरा कृषी संशोधन केंद्रातील डॉ. संदीप देशमुख व त्यांचे सहाकारी सदरील अभियानाअंतर्गत संपूर्ण जिल्हयातील शेतकऱ्यांना फळबाग लागवडीच्या संदर्भाने मार्गदर्शन करीत आहेत.

संशोधकांच्या या शिष्टमंडळाने सोमवार दि. ९ जुन रोजी माजी मंत्री आमदार अमित देशमुख यांच्या बाभळगाव येथील शेतीला भेट देऊन तेथील खजूर आणि ड्रॅगन फ्रुट लागवडीची पाहणी केली. त्यानंतर मंगळवारी सकाळी आमदार अमित देशमुख यांच्या संपर्क कार्यालयात त्यांनी भेट दिली. या प्रसंगी विलास कारखान्याचे व्हा.चेअरमन वैजनाथराव शिंदे, टवेटिवन शुगर्सचे उपाध्यक्ष विजय देशमुख, जनरल मॅनेजर संतोष बिराजदार, जनसंपर्क अधिकारी पांडूरंग कोळगे व शेतकी विभागातील अधिकरी, कर्मचारी यांच्याशी संवाद साधला.

या प्रसंगी मार्गदर्शन करतांना डॉ. बसना गौडा म्हणाले की, ऊस व इतर बागायती शेतकऱ्यांनी शेती वयवसायाला जोड व्यवसाय म्हणून बांधावर व मोकळया जागेत फळझाडाची लागवड केल्यास त्यांना अतिरीक्त उत्पन् मिळू शकते. त्यांना या झाडापासून चांगले उत्पन्न मिळवायचे असेल तर रोपाची निवड करतांना विशेष काळीज घ्यावी लागेल असेही त्यांनी सांगीतले. मध्यत्तरी तेल्या रोगामुळे डांळीब उत्पान्नात घट झाली होती परंतु आता संशोधनातून तेल्या रोगांवर मात करणारी रोपे तयार झाली आहेत. फक्त डांळीबच नव्हे तर इतर फळाची रोपेही संशोधित वानाची रोपे खात्रीशीर ठीकाणाहून खरेदी करावीत असे त्यांनी सांगीतले.

वर्षात १५० मीली मीटर पाऊस पडणाऱ्या राजस्थानमध्ये खजूर आणि ड्रागनफ्रुटची शेती फायदयाची ठरत आहे. ७५० मीली मीटर पाऊस पडणाऱ्या लातूर जिल्हयात तर या फळझाडाची लागवड राजस्थानपेक्षाही अधिक फायदयाची ठरणार आहे, त्यामुळे शेतकऱ्यांनी योग्य नियोजन करुन फळबाग लागवडीचा पर्याय निवडावा त्यासाठी शासनाचा कृषी विभाग, साखर कारखान्याचा कृषी विभाग यांनी शेतकऱ्यांना योग्य मार्गदर्शन करावे असे आवाहन डॉ. रामनीवास यांनी यावेळी केले.

प्रारंभी संपर्क कार्यालयात सर्वच शास्त्रज्ञाचे व्हा. चेअरमन वैजनाथराव शिंदे, टवेटिवन शुगर्सचे उपाध्यक्ष विजय देशमुख, जनरल मॅनेजर संतोष बिराजदार, जनसंपर्क अधिकारी पांडूरंग कोळगे यांनी स्वागत केले.

## पुणे महानगरपालिका हद्दीत नव्याने समाविष्ट झालेल्या गावांना तातडीने योग्य प्रमाणात पाणीपुरवठा करा - विधानपरिषदेचे सभापती प्रा.राम शिंदे



मुंबई:- पुणे महानगरपालिकेने शहरातील पाणीपुरवठा योग्य प्रमाणात होण्यासाठी सन-२०१८ मध्ये २४÷७ योजना आणून देखील अद्याप कात्रज, कोंढवा, येवलेवाडी, पिसोळी या विभागात अपुऱ्या प्रमाणात पाणीपुरवठा होत आहे. शहरात अनेक ठिकाणी अपुऱ्या पाणीपुरवठ्यामुळे नागरिकांना आंदोलन करावे लागत आहे. ही बाब गंभीर असून पुणे महापालिकाहद्दीत नव्याने समाविष्ट झालेल्या गावांना तातडीने योग्य प्रमाणात पाणीपुरवठा होईल या दृष्टीने कार्यवाही करण्यात यावी, असे निदेश महाराष्ट्र विधानपरिषदेचे सभापती प्रा.राम शिंदे यांनी दिले.

विधानपरिषदेचे सदस्य योगेश टिळेकर यांनी अर्थसंकल्पीय अधिवेशन २०२५ मध्ये लक्षवेधी च्या माध्यमातून या प्रश्नाकडे लक्ष वेधले होते. यासंदर्भात सभापती प्रा.राम शिंदे यांच्या दालनात बैठक घेण्यात आली, त्यावेळी हे निर्देश देण्यात आले.

या बैठकीस विधानपरिषदेचे सदस्य आमदार योगेश टिळेकर, विधानमंडळाचे सचिव (३) डॉ.विलास आठवले, पुणे महानगरपालिका आयुक्त नवल किशोर राम (दूरदृष्य प्रणालीद्वारे), अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त ओमप्रकाश दिवटे, उप सचिव नगरविकास श्रीमती प्रियंका छापवाले उपस्थित होते.

सद्य:स्थितीत पुणे मनपास १४ टीएमसी पाणी देण्याचा करार करण्यात आला आहे. नवीन ३४ गावांकरीता पाणीपुरवठा योजना तयार करतांना २१ टीएमसी पाणी उपलब्ध करुन देण्याचा करार करावा. सन २०१८ मध्ये सुरु झालेली ही पाणीपुरवठा योजना अद्याप अपुरी असून गांभीर्याने नियोजन करुन लवकरात लवकर पाणी प्रश्न सोडवावा, असे निर्देश सभापती प्रा. शिंदे यांनी दिले.

# पेरण्यांची घाई नको; पंधरा जून नंतरच मोसमी पाऊस,मंत्रिमंडळाच्या बैठकीत पाऊस, पीक पाणी परिस्थितीचा आढावा

मुंबई, : राज्यात पंधरा जून नंतरच मोसमी पाऊस पूर्णपणे सक्रिय होण्याची शक्यता आहे. त्यामुळे शेतकऱ्यांनी पेरण्या करण्याची घाई करू नये, असे आवाहन राज्याच्या कृषि विभागाने केले आहे. तर राज्यात काही ठिकाणी विजांच्या कडकडाटासह, मुसळधार पाऊस पडण्याची शक्यता वर्तवण्यात आली असून, शेतकरी, मच्छिमार बांधवांनी दक्षता घेण्याचे आवाहनही करण्यात आले आहे.

राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत पाऊस, पीक पाणी, धरणाच्या जलाशयातील पाणी साठा आदीचा आढावा घेण्यात आला. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस होते.

या बैठकीत कृषि विभागाचे प्रधान सचिव विकासचंद्र रस्तोगी यांनी राज्यातील पीक पाणी, पेरण्या खते पुरवठा याबाबत सादरीकरणाद्वारे माहिती दिली. त्यांनी सांगितले की, 'राज्यातील सर्व भागात पंधरा जून मोसमी पाऊस सक्रिय होण्याची शक्यता आहे. त्यामुळे शेतकऱ्यांनी पेरण्या करण्याची घाई करू नये. पंधरा जून नंतरच पावसानंतर मार्गक्रमण होण्यासाठी सक्रिय वातावरण निर्मिती होण्याची शक्यता आहे. राज्यातील सतरा जिल्ह्यात पंचवीस टक्के पेक्षा कमी, बारा जिल्ह्यात पंचवीस ते पन्नास टक्के, चार जिल्ह्यांत पन्नास ते पंच्याहत्तर टक्के तर एका जिल्ह्यात शंभर टक्के हून अधिक पाऊस झाला आहे. राज्यातील विविध विभागांत खते आणि बियाणे यांचा सुरळीत पुरवठा झाला आहे. अनेक भागात खतांचा पुरेसा साठा उपलब्ध आहे.

मोसमी पाऊस तीन-चार दिवसांत सक्रिय मोसमी पाऊस येत्या तीन ते चार दिवसांत पुन्हा सक्रिय होण्याची शक्यता आहे.



दक्षिण व्दीपकल्पीय भारताच्या भूभागातील कर्नाटकात १२ ते १५ जून दरम्यान आणि कोकण आणि गोवा येथे १३ ते १५ जून दरम्यान मुसळधार पाऊस पडण्याची शक्यता आहे, अशी माहिती वेधशाळेच्या संचालक शुभांगी भुते यांनी सादरीकरणाद्वारे दिली. त्यांनी सांगितले की, मोसमी पावसाच्या मार्गक्रमणासाठी अनुकूल वातावरण निर्मिती होण्याची शक्यता येत्या तीन ते चार दिवसांत आहे. त्यानुसार मध्य महाराष्ट्रात १२ जून रोजी मराठवाड्यातील काही भागात १२ ते १४ जून दरम्यान पाऊस पडण्याची शक्यता आहे. कोकण, गोवा येथे १२ आणि १५ जून दरम्यान मुसळधार तर १३, १४ जून रोजी अति मुसळधार पाऊस पडण्याची शक्यता आहे. मध्य महाराष्ट्रात १३ ते १५ जून दरम्यान मुसळधार पाऊस पडण्याची शक्यता आहे. या कालावधीत मच्छिमारांनी समुद्रात मासेमारी करण्यासाठी जाऊ नये. वीजांच्या गडगडाटांसह वादळ होत असताना खुल्या मैदानावर काम करु नये, वीजा होताना झाडांच्या खाली आसरा घेऊ नये, इलेक्ट्रॉनिक उपकरणांचा वीज पुरवठा खंडित करुन ठेवावा, ओढा, तलाव, नदी आदी पाण्याच्या स्त्रोतातून तत्काळ बाहेर पडावे, वीज वहन करणाऱ्या सर्व वस्तूंपासून दूर राहावे, अशा सूचना त्यांनी दिल्या.

धरणातील पाणीसाठा समाधानकारक राज्यातील सर्व प्रमुख धरणात गेल्या वर्षीच्या तुलनेत चांगला पाणीसाठा असल्याचे आज मंत्रिमंडळाच्या बैठकीत सांगण्यात आले. जलसंपदा विभागाचे अतिरिक्त मुख्य सचिव दीपक कपूर यांनी माहिती दिली.

धरणाचे नाव, सध्याचा पाणी साठा, गेल्या वर्षीचा साठा - गोसीखुर्द ४.६४ टीएमसी (८.६७), तोतलाडोह १८.७९ (१८.१४), ऊर्ध्व वर्धा ८.८५ (८.८७), जायकवाडी २२.६०(२.९९), मांजरा १.६३(०.००), ऊर्ध्व तापी हातनूर ५.३२(२.६३), गंगापूर २.५०(२.४८), कोयना १७.३६(१०.००), खडकवासला०.८४(१.०३), उजनी १८.७२(०.००), भातसा ९.९५(८.१७), धामणी ३.११(१.७७).

# विरोध कोणाचा, कोणासाठी ?

## संपादकीय...

लोकशाहीत विरोध, अनुरोध यश, अपयश, वाद, विवाद संवादाला अधिक महत्त्व असते. भारतातील प्रत्येक महिला, पुरुष नागरिकांना व्यक्ति स्वतंत्र्य आणि अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा घटनादत्त अधिकारा आहे. त्यामुळे समाजकारण, राजकारण, सत्ताकारणासह प्रसार माध्यमे ही आपापल्या मर्जीनुसार हक्काच्या आधीन राहून प्रत्येक जण कार्यरत राहतो. सामाजिक, राजकीय पक्षात सत्ताधारी विरोध पक्ष, व्यक्ती, अभिव्यक्ती नुसार राजकारण, सत्ताकारण करीत असतात. त्यातून गेल्या दहा अकरा वर्षांपासून सत्तासाठी भाजपा, महायुती आणि काँग्रेस इंडिया महाविकास आघाडीत नेहमीचीच तू तू मै,मै होताना दिसते आहे. त्यामुळे सत्ताधारी, विरोधी पक्षनेते लोकशाहीची कशी खिचडी करून संविधानालाच कसे वेठीस धरत आहेत, ते केंद्रीय निवडणूक आयोग आणि काँग्रेसच्या राहुल गांधी यांच्यातील निवडणूक संदर्भातील आरोप, प्रत्यारोपातून समोर येताना दिसते आहे.

बिहार विधानसभा निवडणुकीच्या निमित्ताने लोकसभेतील विरोधी पक्ष नेते काँग्रेसच्या राहुल गांधी यांनी महाराष्ट्र विधानसभा निवडणुकी प्रमाणेच बिहार विधानसभा निवडणूक मॅच फिक्सिंग प्रमाणे मतदान फिक्सिंग होण्याची शक्यता टाळता येत नाही, अशी शंका गत महाराष्ट्र विधानसभा निवडणूक निकालाचा हवाला देऊन निवडणूक आयोगावर आरोप केला, तसा सविस्तर लेख ही वृत्तपत्रातून लिहिला आणि राजकीय वर्तुळात पुन्हा गदारोळ उलट सुलट कुजबूज सुरू झाली. केंद्रीय निवडणूक आयोगाने ही आपली बाजू मांडून राहुल गांधी यांचा आरोप चुकीचा असून प्रसार माध्यमे किंवा लेखातून आरोप टीका करणे ऐवजी निवडणूक आयोगाला लेखी अधिकृत पत्र द्यावे असे आवाहन निवडणूक आयुक्ताने राहुल गांधी यांना देऊन गांधीच्या आरोपावर पडदा टाकला असला तरी, पेल्यातल्या राजकीय वादळ संपलेले नसल्याने भाजपाचे निष्ठावंत नेते निवडणूक आयोगाची बाजू घेऊन भाजपा-सृष्टीची शाबासकी मिळविण्यासाठी राहुल गांधीवर सडकून टीका करून काँग्रेस पक्षालाच लक्ष करण्याचा प्रयत्न करीत असले तरी, विरोधक कोण, कोणासाठी, कशासाठी आणि कोणाला करीत आहेत, याविषयी राजकीय वर्तुळात उलट सुलट प्रतिक्रिया व्यक्त होताना दिसते आहे.

ज्यांना जनतेने नाकारले तेच जनादेशाला नाकारतात या शीर्षकाचा काँग्रेसच्या राहुल गांधी विरोधात मुख्यमंत्री देवेंद्र फडणीस यांनी लेख लिहून निवडणूक आयोगाची बाजू घेतली. भाजपाचा विजय न्यायिक व खात्रीलायक असल्याचा निर्मळा देऊन, काँग्रेसचा पराभव का झाला, कशामुळे झाला, पराभवाची कारणे का आहेत, काँग्रेस कुठे कमी पडली, या संदर्भात आत्मपरीक्षण करण्याचा सल्लाही फडणवीस यांनी राहुल गांधी यांना दिला. यासंदर्भातील देवेंद्र फडणीस यांची काकलूत ही, निवडणूक आयोगासह प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आणि अमित शहा यांची शाबासकी आणि भविष्यातील आशीर्वाद बळकट करण्यासाठीच असावेत ! कारण राहुल गांधी यांच्या आरोपाचे खंडन, उत्तर वगैरे निवडणूक आयोगाने भाजप नेतृत्वानेच दिले पाहिजेत, परंतु देवेंद्र फडणवीस यांनी होयबाची भूमिका बजावली असली तरी फिक्सिंगचा आरोप केवळ राहुल गांधीच नव्हे इतर विरोधी पक्षाचे नेते करतात असतात, परंतु विरोध कोणाचा, कोणासाठी, कशामुळे हेच कळत नसेल अशा कृती, वृत्तीला कोणत्या शब्दाने बोलावे, अशीच कुजबूज होताना दिसते आहे.

# साने गुरुजी

आज भारत मातेचे थोर सुपुत्र,



स्वातंत्र्य सैनिक, समाजवादी विचारवंत, सामाजिक कार्यकर्ते, मराठी साहित्यिक साने गुरुजी यांची पुण्यतिथी. साने गुरुजी यांचे पूर्ण नाव पांडुरंग सदाशिव साने. त्यांचा जन्म २४ डिसेंबर १८९९ रोजी कोकणातील पालगड येथे झाला. त्यांचे वडील सदाशिवराव हे पालगडचे खोत होते. लहानपणापासून साने गुरुजींचे त्यांच्या आईवर खूप प्रेम होते. त्यांच्यावर त्यांच्या आईच्या शिकवणुकीचा खूप प्रभाव होता. श्यामची आई या पुस्तकात त्यांनी आपल्या आईच्या साऱ्या आठवणी सांगितल्या आहेत. साने गुरुजींच्या आईने त्यांच्या बालमनावर जे संस्कार केले त्यातूनच त्यांचा जीवनविकास झाला. सर्वांवरती प्रेम करा हा धडा त्यांना त्यांच्या आईनेच दिला. साने गुरुजींचे मन अतिशय भावनाप्रधान व संस्कारक्षम होते. म्हणूनच आईने पेरलेल्या सदभावनांची वाढ त्यांच्या ठिकाणी लवकर झाली. शिक्षण पूर्ण झाल्यावर त्यांनी अमळनेर येथील प्रताप हायस्कूलमध्ये काहीकाळ शिक्षक म्हणून नोकरी केली. प्रताप हायस्कूलच्या वसतिगृहाची जबाबदारी सांभाळताना त्यांच्यातील शिक्षकाला अधिक वाव मिळाला. त्यांनी वसतिगृहातील विद्यार्थ्यांना स्वाबलंबनाचे धडे दिले. सेवावृत्ती शिकवली. १९२८ साली त्यांनी विद्यार्थी हे मासिक सुरू केले. त्यानंतर त्यांनी विपुल लेखन केले. कांदबऱ्या, लेख, निबंध, काव्य, चरित्रे, नाट्यसंवाद अशा सर्व साहित्य प्रकारात त्यांची लेखणी अविरत चालली. त्यांच्या साहित्यात करुणा, स्नेह, प्रेम या गोष्टीचा वर्षाव झालेला आहे. त्यांच्या भाषेला एकप्रकारची धार आहे, बोध आहे. त्यांनी अतिशय साध्या आणि सोप्या शब्दात लेखन केल्याने लोकांना ते भावले. नाशिकच्या कारागृहात असताना त्यांनी श्यामची आई ही अजरामर कादंबरी लिहिली. धुळ्याच्या तुरुंगात त्यांनी विनोबा भावेंनी सांगितलेली गीताई लिहिली. साने गुरुजी थोर देशभक्त होते त्यांच्यावर महात्मा गांधींचा मोठा प्रभाव होता. ते स्वतः खादीचाच वापर करत. १९३० साली त्यांनी सविनय कायदेभंग आंदोलनात भाग घेतला त्यामुळे त्यांना तुरुंगवास भोगावा लागला होता. काँग्रेस नावाचे साप्ताहिक त्यांनी सुरू केले, दुष्काळात शेतकऱ्यांची करमाफी मिळावी यासाठीही त्यांनी आंदोलन केले होते. १९४२ च्या भारत छोडो आंदोलनात त्यांनी भाग घेतला. भूमिगत राहून स्वातंत्र्याचा प्रचार, राष्ट्र सेवा दलाचे कार्य या माध्यमातून त्यांनी राजकीय कार्य केले. पत्री या त्यांच्या पहिल्या काव्यसंग्रहात त्यांनी अनेक देशभक्तीपर गीते लिहिली. त्यातील बलसागर भारत होवो... या गीताने तरुणांना स्फुरण चढले या गीताने प्रेरित होऊन हजारो तरुण स्वातंत्र्य चळवळीत सहभागी झाले. या गीताचा वाढता प्रसार पाहून इंग्रज सरकारने या काव्यसंग्रहाच्या प्रती जप्त करुन या गीतावर बंदी आणली. साने गुरुजींना अस्पृश्यता, जातीपात, रूढी परंपरा, अंधश्रद्धा याविषयी कमालीची चीड होती. या गोष्टींना त्यांनी नेहमीच विरोध केला. पंढरपूरच्या विठ्ठल मंदिरात दलितांनाही प्रवेश मिळावा यासाठी १९४६ साली त्यांनी महाराष्ट्राभर दौरा केला. त्यासाठी त्यांनी उपोषण केले त्यांच्या प्रयत्नांमुळेच पंढरपूरच्या विठ्ठलाचे मंदिर सर्वांसाठी खुले झाले. एका पांडुरंगाने दुसऱ्या पांडुरंगाला मुक्त केले असे त्यावेळी म्हटले गेले. स्वातंत्र्य मिळाल्यावर ते समाजवादी पक्षात सामील झाले. स्वातंत्र्यानंतर आंतरभारती चळवळीच्या माध्यमातून त्यांनी देश जोडण्याचा प्रयत्न केला. विविध राज्यातील लोकांनी एकमेकांची संस्कृती समजून घ्यावी, अनेक भाषा समजून घ्याव्यात असा उद्देश या चळवळीचा होता. त्यांनी स्वतः तामिळ व बंगाली या भाषा शिकल्या होत्या. १९४८ साली त्यांनी साधना हे मासिक सुरू केले. या मासिकांतून ते जनजागृती करू लागले. ११ जून १९५० रोजी त्यांचे दुःखद निधन झाले. साने गुरुजींना पुण्यतिथी निमित्त विनम्र अभिवादन.

**श्याम ठाणेदार**
**दौंड जिल्हा पुणे**
**९९२२५४६२९५**

# पतीवरील प्रेमाचे प्रतीक : वट पौर्णिमा

वट पौर्णिमा ज्याला वट सावित्री व्रत देखील म्हणतात. हा महाराष्ट्र, गोवा या पश्चिम भारतीय राज्यांमध्ये विवाहित म हिलांनी साजरा केलेला हिंदू उत्सव आहे. तात्विक दृष्टिकोनातून, वटवृक्ष दीर्घायुष्य आणि अमरत्वाचे प्रतीक म्हणून देखील स्वीकारले जाते. वटवृक्ष हे ज्ञान आणि निर्वाणाचेही प्रतीक आहे. भगवान बुद्धांना याच झाडाखाली ज्ञान प्राप्त झाले. म्हणूनच पतीच्या दीर्घायुष्यासाठी वटवृक्षाची पूजा करणे हा या व्रताचा भाग झाला. कथा कर्माबरोबरच स्त्रिया उपवास करतात आणि पूजा करतात आणि परिक्रमेदरम्यान वटवृक्षाभोवती सुताचे धागे गुंडाळतात. एक विवाहित स्त्री तिच्या पतीवरील प्रेमाचे प्रतीक झाडाभोवती एक औपचारिक धागा बांधून दर्शवते. या व्रतामागे एक पारंपरिक सावित्री आणि सत्यवान यांची पौराणिक आख्यायिका सांगितली जाते. वटपौर्णिमेला स्त्रिया वडाच्या झाडाची पूजा करतात. पर्यावरणशास्त्राच्या दृष्टीने वडाचे महत्त्व विशेष असल्याने त्याच्या विषयी कृतज्ञता व्यक्त करणे हा ही पूजेचा एक हेतू आहे. वट सावित्री व्रत शुभ आणि संतान प्राप्तीसाठी म दत करणारे मानले जाते. भारतीय संस्कृतीत हे व्रत आदर्श स्त्रीत्वाचे प्रतीक बनले आहे. या व्रताच्या तिथीबाबत वेगवेगळे मतप्रवाह आहेत. स्कंद पुराण आणि भविष्योत्तर पुराणानुसार ज्येष्ठ महिन्यातील शुक्ल पक्षाच्या पौर्णिमेला हे व्रत करण्याचा नियम आहे, तर निर्णयामृत वगैरेनुसार ज्येष्ठ म हिन्यातील अमावास्येला उपवास करण्याचे सांगितले आहे.

ज्येष्ठ शुद्ध त्रयोदशी पासून पौर्णिमेपर्यंत हे त्रिरात्र व्रत करावे असे सांगितले आहे. तीन दिवस उपवास करणे अशक्य असेल त्यांनी फक्त पौर्णिमेलाच उपवास करावा. सावित्रीसह ब्रम्हदेव ही या व्रताची मुख्य देवता असून सत्यवान-सावित्री, नारद व यमधर्म या उपांग देवता आहेत. या व्रताचा विधी असा, नदीकाठची वाळू आणून पात्रात भरावी, तिच्यावर सत्यवान आणि सावित्री यांच्या मूर्ती ठेवाव्यात मग त्यांची षोडशोपचारे पूजा करावी. त्यानंतर पाच अर्घ्ये द्यावीत, मग सवित्राची प्रार्थना करावी. पूजा झाल्यावर संध्याकाळी सुवासिनीसह सावित्रीची कथा ऐकावी. या व्रतात सावित्रीच्या मूर्तीची पूजा सांगितलेली असली तरी रूढी मात्र वेगळी आहे. सावित्रीने आंतरिक गुणांची पारख करून निवडलेल्या वरास आई-बाप आणि देवगुरू यांच्या विरोधाला डावलून माळ घातली व पतीचे प्राण वाचवण्याचे अवघड काम चिकाटीने, दुर्दम्य इच्छाशक्तीने आणि चातुर्याने करून दाखविले. योगी अरविंद यांनी आध्यात्मिक परिभाषेतून सावित्रीचे महत्त्व सांगणारे 'सावित्री' नावाचे महाकाव्य लिहिले आहे.

वटवृक्षाचे पूजन आणि सावित्री-सत्यवान कथेचे स्मरण करण्याच्या विधीम ुळे हे व्रत वट सावित्री म्हणून प्रसिद्ध झाले. भारतीय संस्कृतीत सावित्रीला ऐतिहासिक पात्र मानले जाते. सावित्री म्हणजे वेदमाता गायत्री आणि सरस्वती. सावित्रीचा जन्मही विशेष परिस्थितीत झाला. भद्रा देशाचा राजा अश्वपती यांना मूलबाळ नव्हते असे म्हणतात. त्यांनी संततीप्राप्तीसाठी मंत्रोच्चारांसह दररोज एक लाख अर्पण केले. हा क्रम अठरा वर्षे चालू राहिला. यानंतर सावित्री देवी प्रकट झाली आणि वरदान दिले की, 'राजन, तुझ्या पोटी एक तेजस्वी मुलगी होईल'. सावित्रीदेवीच्या कृपेने जन्माला आल्याने म ुलीचे नाव सावित्री ठेवण्यात आले. सावित्री अतिशय सुंदर, नम्र व गुणी मुलगी होती. सावित्री उपवर झाल्यावर राजाने तिलाच आपला पती निवडण्याची परवानगी दिली. सावित्रीने सत्यवान नावाच्या राजकुमाराची निवड केली. सत्यवान हा शाल्व राज्याचा धृमत्सेन नावाच्या अंध राजाचा मुलगा होता. शत्रूकडून हरल्यामुळे आपल्या राणी व मुलासहित राजा जंगलात राहत होता. भगवान नारदाला सत्यवानाचे आयुष्य केवळ एक वर्षाचेच असल्याचे माहित असल्यामुळे त्यांनी त्याच्याशी लग्न करू नको असा सल्ला सावित्रीला दिला. पण सावित्रीने ते मान्य केले नाही. तिने सत्यवानाशी विवाह केला व जंगलात येऊन ती नवऱ्याबरोबर सासू सासऱ्याची सेवा करू लागली.

सत्यवानाचा मृत्यू जेव्हा तीन दिवसावर येऊन ठेपला तेव्हा तिने तीन दिवस उपवास करून सावित्री व्रत आरंभिले. सत्यवान जंगलात लाकडे तोडण्यास निघाला असता सावित्री त्याच्या बरोबर गेली. लाकडे तोडता-तोडता त्याला घेरी आली व तो जमिनीवर पडला. यमधर्म तिथे आला व सत्यवानाचे प्राण नेऊ लागला. सावित्री यमाच्या मागे आपल्या पतीबरोबर जाऊ लागली. यमाने अनेक वेळा सावित्रीस परत जाण्यास सांगितले. पण तिने साफ नाकारले व पतीबरोबर जाण्याचा हट्ट धरला. अखेर कंटाळून यमाने पती सोडून तिला तीन वर मागण्यास सांगितले. सावित्रीने सासू-सासऱ्याचे डोळे व राज्य परत मागितले व आपल्याला पुत्र व्हावा असा वर मागितला. यमराजाने गफलतीने तथास्तु म्हटले. तेव्हा त्याला वचनबद्ध झाल्याची आठवण झाली व सत्यवानाचे प्राण परत करावे लागले. सत्यवानाचे प्राण सावित्रीने वडाच्या झाडाखालीच परत मिळविले म्हणून ज्येष्ठ महिन्यात पौर्णिमेला स्त्रिया वडाच्या झाडाची पूजा करून उपवास करतात व वट सावित्री व्रत आचरतात. सर्व पवित्र वृक्षांत वटवृक्षाचे आयुष्य जास्त असून पारंब्यांनी त्याचा विस्तारही खूप होतो. अशा वटवृक्षाची पूजा करून स्त्रिया 'मला व माझ्या पतीला आरोग्यसंपन्न दीर्घायुष्य लाभू दे, धनधान्य व मुले-नातू यांनी माझा प्रपंच विस्तारित व संपन्न होऊ दे', अशी प्रार्थना करतात.

सन् आहे सौभाग्याचा, बंध आहे अतूट नात्याचा ।
या शुभदिनी पूर्ण होवोत तुमच्या सर्व इच्छा ।।
वट पौर्णिमेच्या हार्दिक शुभेच्छा!

**प्रविण बागडे**
**भ्रमणध्वनी : ९९२३६२०९१९**

# झरोका

एक - देशाच्या विकासासाठी महिला सशक्तीकरण महत्त्वाचे असल्याचे स्पष्टीकरण प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी त्यांच्या सत्ताकारणाला ११ वर्षे पूर्ण झाल्याबद्दल आनंदोत्सव साजरा करताना केले. पण सविस्तर काय ते सांगितले नसल्याने बुचकळा वाटतोय, काहीच कळत नाही. डोकं बधिर झालंय.

दुसरा - अरे, तू कशाला बुचकळ्यात पडतो आहेस, आजवरच्या कोणाच पंतप्रधानांनी केलं नाही ते प्रधानमंत्री नरेंद्र मोदी करीत आहेत. त्याची दर आठवड्याची महिनाभराची, मन की बात ऐकत नाहीस काय? बडबड करू नकोस.

एक - अहो, महिलांसाठी उज्वल गॅस योजना सुरु केली ती सध्या पैसे वसूल केले जात आहेत. घरगुती गॅसची भाव वाढ केली, सबसिडी बंद केली, महिलावर अत्याचार, अन्याय होत आहेत, त्याचे निराकरण नाही. जनधन योजना कागदावरच आहे. प्रधानमंत्री घरकुल योजना, स्वस्त धान्य दुकानात गरजूंना नासके धान्य पुरवठा करणे यातून महिला सक्षमीकरण करणे कसे काय होते. लष्करात महिलांना संधी ही तर तत्कालीन संरक्षण मंत्री शरद पवार यांचा निर्णय आहे, मग प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी महिलांसाठी काय केले हेच कळत नाही. म्हणून बोलतो आहे.

दुसरा - अरे, प्रधानमंत्री नरेंद्र मोदी हे बोलून दाखवीत नाही. तर करून दाखवितात. भारताच्या राष्ट्रपती द्रोपती मुर्मू ह्या आदिवासी महिला असल्याने त्यांना प्रवास नको म्हणून अयोध्या राम प्राणप्रतिष्ठापना कार्यक्रमाचे निमंत्रण दिले नाही. नवीन लोकसभा संसद भवन भूमिपूजन टाळले, केंद्रीय मंत्रिमंडळातील महिला मंत्रीगणाना बोलण्याचा त्रास नको म्हणून त्यांना बोलू दिले जात नाही, किंवा निर्णय घेऊ दिले जात नाहीत, पत्रकारितेत महिला ही असतात म्हणून त्या पत्रकार महिला त्रास नको म्हणून त्यांच्याबरोबर पुरुष पत्रकाराने आजवर एकदाही पत्रकार परिषदेला बोलविले नाही किंवा अकरा वर्षात एकही खास पत्रकार परिषद घेतली नाही, देशभरातील प्रशासनात महिला अधिकारी असल्या तरी तिथं भाजपाधार्जिने अधिकारी, कर्मचारी निर्णय घेतात, एवढी प्रधानमंत्री मोदीजी महिलांची काळजी घेतात. मग आणखीन काय हवे ते तरी सांग.

एक - अहो, प्रधानमंत्री मोदीजीची हेच महिला सशक्तिकरण आहे काय ? तेच मला अवगत नव्हते. माफ करा.

# लातूर एज्युकेशन सोसायटीच्या वतीने नुतन शिक्षणाधिकारी मठपती यांचा सत्कार

लातूर/प्रतिनिधी : लातूर येथील माध्यमिक शिक्षण विभागाच्या शिक्षणाधिकारी म्हणून दत्तात्रय मठपती यांनी नुकताच पदभार घेतला. मठपती यांच्या नियुक्तीबद्दल लातूर एज्युकेशन सोसायटीच्या वतीने संस्थेचे अध्यक्ष तथा माजी नगराध्यक्ष विक्रम गोजमगुंडे यांनी मठपती यांचा यथोचित सत्कार केला. तसेच संस्थेच्या गुणवंत विद्यार्थ्यांच्या सत्कार सोहळ्यासाठी प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहण्यासाठी त्यांना निमंत्रणही देण्यात आले.



लातूरच्या एज्युकेशन हबचा संपूर्ण महाराष्ट्रात दबदबा आहे. शिक्षणाचा लातूर पॅटर्न देशभरात परिचित असून राज्यभरातील विविध भागातील विद्यार्थी शिक्षणासाठी लातूर शहरात येतात.त्यामुळे येथील शिक्षण विभागाचे महत्वही तितकेच आहे. येथील माध्यमिक शिक्षण विभागाचे शिक्षणाधिकारी म्हणून दत्तात्रय मठपती यांनी नुकताच पदभार घेतला. त्याबद्दल लातूर एज्युकेशन सोसायटीच्या वतीने संस्थेचे अध्यक्ष तथा माजी नगराध्यक्ष विक्रम गोजमगुंडे यांनी आपल्या सहका-यांसह शासकीय कार्यालयात जावून त्यांची भेट घेतली यावेळी संस्थेच्या वतीने शिक्षणाधिकारी मठपती यांचा सत्कार करून त्यांच्या भावी कार्यास शुभेच्छा दिल्या. यावेळी विक्रम गोजमगुंडे यांनी लातूर एज्युकेशन सोसायटीच्या कार्याबाबत व शैक्षणिक उपक्रमांबाबत माहिती देवून विविध विषयांवर चर्चा केली. लातूर एज्युकेशन सोसायटीच्या गुणवंत विद्यार्थ्यांचा लवकरच सत्कार करण्यात येणार असून या सोहळ्यासाठी दयानंद मठपती यांनी उपस्थित रहावे अशी विनंती गोजमगुंडे यांनी केली. यावेळी संस्थेचे उपाध्यक्ष प्रल्हाद दुडीले, प्राचार्य संजय मलवाडे, मुख्य लिपीक अजय आरदवाड यांच्यासह इतर सहकारी उपस्थित होते.

# साहित्य भारतीच्या लातूर जिल्हा कार्यकारिणीत अध्यक्षपदी साहित्यिक शैलजा कारंडे यांची निवड!

लातूर : अखिल भारतीय साहित्य परिषद पुरस्कृत साहित्यभारती लातूरची वर्ष २०२५-२६ साठी जिल्हा कार्यकारणी जाहीर करण्यात आली. जिल्हा अध्यक्षपदी प्रसिद्ध साहित्यिक तथा अभियंता व बांधकाम व्यावसायिक शैलजा कारंडे यांची नुकतीच निवड करण्यात आली.उपाध्यक्ष म्हणून चाकूर



येथील डॉ.राजेश तगडपल्लेवार व चापोली येथील डॉ.विजयकुमार ढोले,कार्याध्यक्ष म्हणून अहमदपूर येथील प्रा.डॉ.रामचंद्र पस्तापुरे,संघटन मंत्री म्हणून लातूर येथील उमेश सेलूकर,सहसंघटन मंत्री म्हणून हाडोळती येथील प्रा.डॉ.बालाजी भंडारे तर प्रसिद्धी प्रमुख म्हणून लातूर येथील डॉ.रामशेट्टी शेटकार यांची निवड करण्यात आली.जिल्हा कार्यकारणी सदस्यपदी डॉ.प्रदीप पाटील (निलंगा प्रभारी),डॉ.प्रणिता चाकूरकर(लातूर), प्रा.अश्रिवनी निवर्गी (उदगीर प्रभारी), प्रा.डॉ.जितेंद्र शेळके (लातूर) यांची निवड करण्यात आली.

# काय बोलता राव ?

उद्धव ठाकरे, राज ठाकरे एकत्र यावेत, सोबत एकनाथराव शिंदे ही एकत्र यावे अशी भावना शिंदे, सेनेचे नेते गजानन कीर्तिकर यांनी व्यक्त केली असली तरी ते त्यांचे वैयक्तिक मत आहे. उद्धव ठाकरे यांचा राजकीय कारभार आटोपला अशी बोचरी टीका शिंदे, सेनेचे नेते रामदास कदम यांनी केली आहे. ही नौटंकी काय तेच कळत नाही.

## काय बोलता राव !

अरे, गजानन कीर्तिकर हे दहा वेळा आमदार, खासदार, मंत्री राहिलेले शिंदे सेनेचे नेते आहेत तर रामदास कदमही आमदार, मंत्री राहिलेले आहेत. पण हे दोघे भिन्न मतप्रदर्शन करीत असल्याने ठाकरे बंधू एकत्र झाले तरी एकनाथराव शिंदे हे कोणतेही ठाकरे शी सहमत असू शकत नाहीत. महाराष्ट्रात फडणवीस, शिंदे हेच स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीत एकत्र राहतील की काय अशीच राजकीय परिस्थिती दिसत असली तरी, एकूणच दोन्ही ठाकरे बंधू एकत्र आले तरी महायुती किंवा महाविकास आघाडीवर परिणाम होणार नाही. कारण शहरी, ग्रामीण मतदाराचा कौल स्थानिक परिस्थितीवर अवलंबून असतो. त्यामुळे राजकीय वादळावर, स्थानिक स्वराज्य संस्थेची गणित मांडता येत नाही. अशी प्रसारमाध्यमातून प्रतिक्रिया व्यक्त होताना दिसते, मग बोला दाजीबा.



# नरेंद्र मोदी आणि भारत हे जागतिक समीकरण–मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

मुंबई –पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि भारत हे जागतिक स्तरावरील एक आगळे समीकरण झाले असून मोदी सरकारच्या कारकिर्दीमुळे भारताची जगातील प्रतिष्ठा वाढली आहे. गेल्या ११ वर्षांत मोदी सरकारच्या विविध योजनांमुळे देशातील गरीब, महिला, युवक, दलित, वंचित आणि समाजाच्या सर्व स्तरांतील जनतेच्या जीवनात आमूलाग्र बदल झाला असून देशाला अभूतपूर्व प्रतिष्ठा प्राप्त करून दिल्याबद्दल मी मोदी सरकारचे आणि व्यक्तिशः पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे अभिनंदन करतो व आभारही मानतो, अशा शब्दांत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मोदी सरकारच्या तिसऱ्या पर्वाच्या वर्षपूर्तीनिमित्त आयोजित विशेष पत्रकार परिषदेत आपल्या भावना व्यक्त केल्या. यावेळी भारतीय जनता पार्टीचे प्रदेशाध्यक्ष व महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे, भाजपा मुंबई अध्यक्ष व माहिती तंत्रज्ञान मंत्री आशिष शेलार, भाजपा प्रदेश कार्याध्यक्ष रविंद्र चव्हाण, खा. डॉ. भागवत कराड, आ. अतुल भातखळकर, आ. संजय कुटे, आ. सीमा हीरे, प्रदेश सरचिटणीस आ. विक्रांत पाटील, प्रदेश सरचिटणीस माधवी नाईक आदी उपस्थित होते.

या पत्रकार परिषदेत बोलताना मुख्यमंत्री फडणवीस यांनी मोदी सरकारच्या कार्यकाळातील जनहिताच्या योजनांची संपूर्ण तपशीलवार माहितीच सादर केली. याच काळात देशातील विविध विकास योजनांमुळे महाराष्ट्राच्या विकासास गती मिळाली असून महाराष्ट्र मोदी सरकारचा आभारी आहे, असे ते म्हणाले. राज्यात रेल्वेचे पावणेदोन लाख कोटींचे प्रकल्प सुरू आहेत, असे सांगून ते म्हणाले की, युपीए सरकारच्या काळात दहा वर्षांत राज्याला रेल्वेकरिता मिळाले होते त्याहूनही अधिक निधी मोदी सरकारने एका वर्षात दिला. मोदी सरकारच्या सहकार्यातून राज्यात पायाभूत सुविधांची सहा लाख कोटींची कामे सुरू आहेत. एकाच वर्षात राज्यातील गरीब लाभार्थींकरिता ३० लाख घरे मंजूर करण्याचा विक्रम मोदी सरकारने केला. प्रधानमंत्री ग्रामीण आवास योजनेतील लाभार्थींची सर्व यादी पूर्ण झाली असून नवी यादी तयार करण्याचे केंद्राने सुचविले आहे. 'प्रत्येकाला घर' हा मोदी सरकारचा संकल्प आहे. गरीब कल्याणाचा ध्यास घेऊन देशात मोदींनी विविध योजना राबविल्या. कोविडच्या काळापासून देशातील ८१ कोटी लोकांना मोफत अन्नधान्य दिले, १२ कोटी शौचालये झाली, मुद्रा योजना, स्टँडअप इंडिया अंतर्गत अनुसूचित जातिजमातींच्या लाभार्थींना १४ हजार ७०० कोटींचे कर्ज देऊन आत्मनिर्भरतेचा आधार दिल्यामुळे या वर्गाचे जीवनमान उंचावले आहे. मोदी सरकारच्या काळात ५५ कोटी जनधन खाती उघडली गेली, प्रधानमंत्री सुरक्षा विमा योजनेचा ५१ कोटी लोकांना लाभ मिळाला, आयुष्मान भारत योजनेत ७७ कोटी खाती नोंदविली गेली असून यातून कोट्यवधी गरीबांना मोफत आरोग्य सेवा मिळत आहेत. मोदी सरकाने आतापर्यंत थेट खात्यात दिलेल्या एकत्रित लाभांची किंमत ४२ लाख कोटींची आहे, अशी माहितीही फडणवीस यांनी दिली.



मोदी पर्वात लाखो घरांचे शंभर टक्के विद्युतीकरण झाले असून सामान्यांची घरे विजेने उजळली आहेत, असा गौरवपूर्ण उल्लेख करून गरीब कल्याणाच्या मोदी सरकारच्या अनेक उपक्रमांची माहितीही त्यांनी दिली. मोदी यांच्या नेतृत्वाखालील केंद्र सरकारला सर्वसमावेशक चेहरा असून ६० टक्के मंत्री अनुसीचित जाततीजमातींचे आहेत. मोदी सरकारच्या योजनांचे ८० टक्के, तर प्रधानमंत्री आवास योजनेत ४५ टक्के, विविध शिष्यवृत्त्यांचे ५८ टक्के, मुद्रा योजनेतील ५१ टक्के लाभार्थी अनुसूचित जातीजमातीचे आहेत, असे ते म्हणाले. समाजातील वंचित लोकांना थेट लाभ दिल्यामुळेच २५ कोटी लोकसंख्या गरीबी रेषेच्या वर आली. गेल्या दहा वर्षांत शेती क्षेत्रात पाच पटींनी वाढ झाली. पीएम किसान योजनेअंतर्गत ११ कोटी शेतकऱ्यांच्या खात्यात ३.७ लाख कोटी रुपये आतापर्यंत दिले गेले आहेत. युपीए सरकारने ८० हजार कोटींच्या कर्जमाफीचा डांगोरा पिटला, तर मोदी सरकारने ३.७ लाख कोटी रुपये दिले. प्रधानमंत्री फसल विमा अंतर्गत विमा दावे निकाली काढून शेतकऱ्यांना मोठ्या प्रमाणावर दिलासा दिला आहे, असेही ते म्हणाले.

गेल्या अकरा वर्षांत पिकांच्या हमीभावात सातत्याने वाढ करण्यात आली आहे. दूध उत्पादनात जवळपास ८० टक्के वाढ झाली आहे, मत्स्योत्पादन वाढले आहे, इथेनॉल ब्लेंडिंगमध्ये ३८ कोटी लिटर वरून ४४ कोटी लिटरपर्यंत वाढ झाली असून त्यामुळे एक लाख कोटींचे परकीय चलन वाचले, त्याचा शेतकऱ्यांनाच फायदा मिळाला, असेही ते म्हणाले.

याच काळात मेगा फूड पार्कची संख्या वाढली, सौर पंपांची संख्या १० लाखांच्या वर गेली असून एकट्या महाराष्ट्रात त्यापैकी पाच लाख पंप आहेत. सहकार क्षेत्रात नवे धोरण आणि विशेषतः सहकाराच्या माध्यमातून साखर कारखानदारीला गेल्या ५० वर्षांत झाली नाही एवढी मदत मोदी सरकारने केली. नारीशक्ती वंदन अधिनियमांतर्गत लोकसभेत व विधानसभेत ३३ टक्के महिला आरक्षण, संरक्षणदलात महिलांसाठी कायमस्वरूपी भरती, वायुदलात महिलांना संधी मोदी सरकारमुळे मिळाली. 'बेटी बचाओ बेटी पढाओ' मोहिमेचे सकारात्मक परिणाम दिसू लागले असून स्त्री पुरुष लोकसंख्येतील मोठा फरक कमी झाला आहे. महिलांसाठीच्या विविध योजनांतून महिलांच्या खात्यात कोट्यवधी रुपये दिले. लखपती दीदी योजनेतून महिला आर्थिकदृष्ट्या सक्षम होत आहेत. २०१४ साली स्टार्टअपमध्ये कुठेच नसलेला भारत आता जगातील सर्वात मोठा स्टर्टअप योजनांचा देश ठरला आहे. पगारी महिलांकरिता विविध योजना अंमलात आणून महिलांच्या सक्षमीकरणाबरोबरच, ईपीएफओ मध्ये होत असलेली लाखोंची नवी नोंदणी हा युवकांना नव्या रोजगार संधी मिळाली असल्याचा पुरावा आहे. २,२९७ सरकारी सेवा सर्वसामान्यांकरिता पच्या माध्यमातून उपलब्ध करून दिला. युपीआयच्या वापरकर्त्यांची संख्या प्रचंड वाढली, २३ शहरांत मेट्रोचे नेटवर्क सुरू झाले. मुद्रा योजनेचा दीड कोटी लोकांनी लाभ घेतला आहे, मोफत विजेचे लाखो लाभार्थी देशात आहेत, अशा अनेक कामांची व योजनांची जंत्रीच मुख्यमंत्र्यांनी दिली.

आरोग्य सेवा क्षेत्रातही मोदी सरकारच्या कारकिर्दीत लक्षणीय प्रगती झाली असून एमबीबीएस, पीजीच्या जागा वाढल्याने मोठ्या प्रमाणात डॉक्टर तयार होत आहेत. मोदी सरकारने केलेल्या कामातून स्वाभिमानी भारताचे नवे रूप 'ऑपरेशन सिंदूर' मुळे जगाला दिसले असून ही कारवाई ऐतिहासिक म्हणून इतिहासात नोंदविली जाईल, असेही श्री. फडणवीस म्हणाले. संरक्षण उपकरणांत भारत स्वयंपूर्ण झाला असून आता आपण संरक्षण सामग्रीची निर्यात करत आहोत. शस्त्रनिर्माणच्या क्षेत्रात खाजगी क्षेत्रामुळे निर्यात वाढ झाली असून ७४ टक्के एफडीआय झाली आहे. भारतीयांचे जगाच्या मंचावर महत्व वाढले आहे. चांद्रयान –३ मोहिमेने भारताच्या अंतराळ क्षेत्रात आपले जागतिक महत्व अधोरेखित केले आहे. मोदी सरकारने काश्मीरमधील ३७० कलम रद्द करून परिवर्तन आणले, जगातील पाचव्या क्रमांकाची अर्थव्यवस्था असलेला भारत पुढच्या तीन वर्षांत जगातील तिसऱ्या क्रमांकाची अर्थव्यवस्था म्हणून ओळखला जाईल असा विश्र्वास त्यांनी व्यक्त केला. देशातील विदेशी गुंतवणुकीचा वेगही वाढला असून महाराष्ट्राचा वाटा मोठा आहे, याबद्दलही त्यांनी समाधान व्यक्त केले.

मोदी सरकारच्या कार्यकाळात सर्वाधिक वेगाने विकसित होणारी अर्थव्यवस्था म्हणून भारत उभा राहात आहे. असे नमूद करून ते म्हणाले, याच काळात देशात रोजगाराच्या असंख्य नव्या संधी निर्माण झाल्या. १.८ लाख नव्या कंपन्यांची नोंदणी झाली, अनेक जुने कायदे रद्द करण्यात आले असून नवे समाजाभिमुख कायदे अस्तित्वात आले. इलेक्ट्रॉनिक्स निर्यात आणि उत्पादनात सहापट वाढ झाली आहे. पायाभूत सुविधांचा विस्तार, विमानतळे ८६ झाली. रेल्वे बजेट वाढले, वंदे भारत ट्रेन्समुळे रेल्वे क्रांती, मेट्रो चे जाळे विस्तारले, अमृत भारत योजनेतून रेल्वे स्थानकांचा कायापालट होत आहे. २०२५ मध्ये महामार्गांच्या निर्मितीचा वेग प्रतिदिन २४ किलोमीटर या वेगाने सुरू आहे. पिण्याच्या पाण्याचे नवे प्रकल्प सुरू झाले, ग्रामीण रस्तेबांधणीस वेग आला, २१४ लाख ग्रामपंचायती ऑप्टिकल फायबरने जोडल्या गेल्या, सौरऊर्जा, आणुऊर्जा या अपारंपरिक ऊर्जास्रोतांच्या उभारणीत मोठी वाढ करण्यात आली.

मोदीजींनी सातत्याने 'विकास भी और विरासत भी' हा विचार मांडत सांस्कृतिक व धार्मिक स्थळांच्या सुधारणेकरिता मोठा निधी वितरित केला आहे. मोदी सरकारच्या काळात देशाबाहेर गेलेल्या अनेक मौल्यवान प्राचीन वस्तू परत आणण्यात आल्या, याकडेही मुख्यमंत्र्यांनी लक्ष वेधले. कार्यसंस्कृतीतील हा बदल मोदी सरकारच्या काळात देश अनुभवत आहे. मुंबईसह महाराष्ट्रात दिसणाऱ्या परिवर्तनाचे श्रेयदेखील मोदी सरकारच्या सहकार्यालाच दिले. राज्यातील अनेक रखडलेले प्रकल्प मोदी सरकारनमुळे गतिमान झाले. परिवर्तनाचे हे पर्व सुरू करून विकासाला वेग देत सामान्य माणसाच्या जीवनात नवा आनंद निर्माण केला, अशी भावना त्यांनी व्यक्त केली.

## सत्यजितसिंह पाटणकर आणि वैभव पाटील यांचा भाजपामध्ये प्रवेश

मुंबई : शरद पवार यांचे विधानसभा उमेदवार असलेल्या




विश्र्वासू सहकारी, माजी मंत्री विक्रमसिंह पाटणकर यांचे पुत्र सत्यजितसिंह पाटणकर तसेच खानापूर–आटपाडी मतदारसंघाचे माजी आमदार सदाशिवराव पाटील यांचे पुत्र विट्याचे माजी नगराध्यक्ष वैभव पाटील यांनी पदाधिकाऱ्यांसह मंगळवारी भारतीय जनता पार्टीमध्ये प्रवेश केला. यावेळी भाजपा प्रदेश कार्याध्यक्ष रविंद्र चव्हाण आणि उच्च आणि तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांतदादा पाटील यांनी सर्वांचे पक्षात स्वागत केले. प्रदेश कार्यालयात झालेल्या पक्षप्रवेश कार्यक्रमाला खा. उदयनराजे भोसले, सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रराजे भोसले, सातारा जिल्हाध्यक्ष आ. अतुलबाबा भोसले, सांगली जिल्हाध्यक्ष सम्राट महाडिक, आ. सत्यजित देशमुख, अण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळाचे अध्यक्ष नरेंद्र पाटील, प्रदेश मुख्यालय प्रभारी रवींद्र अनासपुरे, प्रदेश माध्यम विभाग प्रमुख नवनाथ बन आदी उपस्थित होते.

यावेळी कार्याध्यक्ष चव्हाण म्हणाले की २०१९ आणि २०२४ ला राष्ट्रवादी शरद पवार पक्षाचे श्री. पाटणकर आणि श्री. पाटील यांच्या पक्षप्रवेशामुळे सातारा आणि सांगली जिल्ह्यात पक्षाला बळकटी मिळणार आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे विकसित भारत आणि विकसित महाराष्ट्राचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी श्री. पाटणकर आणि श्री. पाटील यांनी भाजपाला साथ दिली आहे. पक्षात प्रवेश केलेल्या सर्वांचा यथोचित मान राखला जाईल अशी ग्वाहीही श्री. चव्हाण यांनी दिली.

सातारा जिल्हा मध्यवर्ती बँकेचे संचालक सत्यजितसिंह पाटणकर यांच्या सोबत हिंदूराव पाटील, याज्ञसेन पाटणकर, राजाभाऊ शेलार, राजेश पवार, आदींनी भाजपामध्ये प्रवेश केला. पाटण तालुका दूधसंघ, अर्बन बँक व खरेदी विक्री संघाचे चेअरमन तसेच सर्व संचालकांनी तसेच सर्व आजी माजी जिल्हा परिषद, पंचायत समिती सभापती, सर्व सदस्यांनी ही भाजपा मध्ये प्रवेश केला. पाटण नगर पंचायत नगराध्यक्ष, उपनगराध्यक्ष आणि नगरसेवकांचाही भाजपामध्ये प्रवेश केलेल्यांमध्ये समावेश आहे.

## कंत्राटी सफाई कामगारांचे काम बंद आंदोलन यशस्वी, १५ दिवसात सर्व मागण्या मंजूर

लातूर : महानगरपालिका अंतर्गत काम करणाऱ्या कंत्राटी सफाई कामगारांना कायद्यानुसार किमान वेतन, पी. एफ., सुरक्षेची साधने, सुट्ट्या व रजा मिळाव्यात यासाठी आठ महिन्यापासून प्रलंबित असलेल्या मागण्यासाठी अखिल महाराष्ट्र जनरल कामगार संघटनेचे संस्थापक अध्यक्ष राजकुमार होळीकर यांच्या नेतृत्वाखाली १० जून रोजी काम बंद आंदोलन करण्यात आले. या आंदोलनाची दखल तात्काळ मनपा आयुक्त देविदास जाधव यांनी घेतली. सफाई कामगारांच्या शिष्ठ मंडळाला बोलावून त्यांच्याशी चर्चा केली आणि १५ दिवसाच्या आत त्यांच्या मागण्या पूर्ण करण्याचे आश्र्वासन दिले. यावेळी अखिल महाराष्ट्र जनरल कामगार संघटनेचे संस्थापक अध्यक्ष राजकुमार होळीकर, भटक्या विमुक्तांचे नेते प्रा. सुधीर अनवले, लेबर युनियचे नेते डॉ. सुधीर देशमुख, शेकापचे नेते उदय गवारे, अखिल कामगार जनरल संघटनेचे शहराध्यक्ष विशाल काळे, ज्योती उपाडे, लहू जगताप, परमेश्र्वर कांबळे, महेंद्र कांबळे, सुधीर कांबळे, अय्युब शेख, ईश्र्वर काळे, सुनील सगट, सचिन काळे, अंजनाताई सगट, अभिजित बनसोडे, कुमार कांबळे, अमोल शिंदे, रोहित कांबळे, अन्तेश्र्वर सगट, अंगद बनसोडे, सूर्यकुमार गायकवाड, ईश्र्वर कासारे, विनोद मोरे, पवन लांडगे, सचिन देसाई, रमाकांत शिंदे, अमोल अडसूळ आदिसह अनेक कामगार पदाधिकाऱ्यांचा समावेश होता.



आज सकाळी साडे दहा वाजल्यापासून मनपाच्या सर्व सफाई कर्मचाऱ्यांनी सर्व वाहने, घंटागाड्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर पार्कवर लावून काम बंद केले. एकही सफाई कर्मचारी कामावर गेला नाही. त्यामुळे लातूर शहरातील सफाईचे, शहर स्वछतेचे काम बंद होते. सफाई कामगारांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास अभिवादन करून आंदोलनाला सुरुवात केली. मानपासमोर कामगारांनी प्रचंड घोषणाबाजी केली. त्यानंतर मनपा आयुक्तानी कामगारांच्या शिष्ठ मंडळास चर्चेसाठी बोलावले. आणि चर्चा झाल्यानंतर सफाई कामगारांच्या मागण्या येत्या १५ दिवसात पूर्ण करण्याचे लेखी आश्र्वासन आयुक्तानी दिले.

## जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांच्या उपस्थितीत वटपौर्णिमेनिमित्त वृक्षारोपण

लातूर, (जिमाका): जिल्हा प्रशासनामार्फत वृक्षारोपण मोहिमेंतर्गत जास्तीत जास्त झाडे लावण्यासाठी प्रयत्न केले जात आहेत. वटपौर्णिमेचे औचित्य साधून प्रत्येक कुटुंबाने किमान १० झाडे लावावीत, असे आवाहन जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर–घुगे यांनी केले होते. वन विभागामार्फत साखरा येथील विलासराव देशमुख वन उद्यानात जिल्हाधिकारी श्रीमती ठाकूर–घुगे यांच्या उपस्थितीत ५० वडाची रोपे लावून या उपक्रमाला सुरुवात झाली.



रोहयोच्या उपजिल्हाधिकारी अहिल्या गाठाळ, सहायक वनसंरक्षक वैशाली तांबे, वृक्षारोपण मोहिमेत सहभागी सुनंदा जगताप, वनपरिक्षेत्र अधिकारी धनंजय पोटे, श्रीमती नागरगोजे, वनपरिमंडळ अधिकारी नीलेश बिराजदार, टी. एस. चिल्ले, पी. टी. देवकरण, वनरक्षक महेश पवार, बालाजी पाटील, गोविंद घुले, धम्मसागर कांबळे यांची यावेळी प्रमुख उपस्थिती होती.

जिल्हाधिकाऱ्यांच्या आवाहनाला प्रतिसाद देत यंदाची वटपौर्णिमा वडाची झाडे लावून साजरी करण्यात आली. या उपक्रमाची सुरुवात श्रीमती ठाकूर–घुगे यांच्या हस्ते साखरा येथील विलासराव देशमुख वन उद्यानात वडाचे झाड लावून झाली. यावेळी ५० महिलांनीही वडाची झाडे लावून या झाडांची पूजा केली.

## लपवाय ..

जीव किती धडपडे
उगा गुपीत लपवाय
माहीत नसते त्याला
असतात सत्तर पाय

एक गुपीत फुटलेवर
चाले नवीन अध्याय
बॉम्ब धुडूम् फोडायां
मुहूर्त नको अनध्याय

कान अतितीक्षणअसे
ऐकाय काहीअतुराय
रहस्य भेद करत जा
उरला एक व्यवसाय

लपविल्या गोष्टीसाठी
कधी नसते आयुर्दाय
पोटातरहस्य अस्वस्थ
अगदी होतो असहाय

उघड करता ते गुपीत
होतो कधी निरूपाय
मोकळी होतात मने
रडतातमोकलून धाय

तेहतीसकोटी देवांस
पोटात सांभाळे गाय
सहासष्टकोटी राक्षस
आमच्याउदरात हाय

## गुपीत दडले ..

प्रत्येकाचे मनांमध्ये
गुपीत असते दडले
अनाहूत नकळतचं
काही असते घडले

खाजगी हवेआयुष्य
त्यात काय बिघडले
लपवून ठेवता सत्य
हृदय सतत झगडले

एखादं मिटलेलेपान
हळू जायं उलघडले
आठवणींचे घड ते
असे तिथे लडगडले

गुपीतम्हणजे लफडे
उगाचं प्रवाद पाडले
साध्या सरळ मनात
संशयी रोपटे वाढले

खोद खोदून विचारे
भगदाडकसे पाडले
रहस्यबिचारे भिऊन
केवढे एकटे पडले

उगा करी रहस्यभेद
गुपीत कसे फोडले
छान डवरलेले फूल
वेलीपासून रे तोडले

- हेमंत मुसरीफ पुणे
९७३०३०६९९६

## उच्च शिक्षण संचालक डॉ. शैलेंद्र देवळाणकर यांना कार्यशाळेचे निमंत्रण

लातूर– राजमाता जिजामाता



शैक्षणिक संकुलाच्यावतीने 'नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण' या विषयावर संकुलात कार्यशाळा घेण्यात येणार आहे. पुणे येथील महाराष्ट्र राज्य उच्च शिक्षण संचालनालयाचे संचालक डॉ. शैलेंद्र देवळाणकर यांना या कार्यशाळेचे प्रमुख पाहुणे म्हणून येण्याबाबत निमंत्रण देण्यात आले.

नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण –२०२० हे भारताच्या शिक्षण व्यवस्थेतील बदल आणि सुधारणांसाठी एक महत्त्वपूर्ण धोरण आहे. या धोरणाचे मुख्य उद्दिष्ट म्हणजे विद्यार्थ्यांना अधिक लवचिक, समग्र आणि २१ व्या शतकातील गरजांना अनुरूप शिक्षण देणे हा आहे. या विषयावर राजमाता जिजामाता शैक्षणिक संकुलात कार्यशाळा घेण्यात येणार आहे.

प्रारंभी संकुलाचे सचिव प्राचार्य डी. एन. केंद्रे यांनी डॉ. देवळाणकर यांचा शाल व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करून कार्यशाळेचे निमंत्रण दिले. यावेळी संकुलाच्या अध्यक्षा के. ए. जायभाये आदी उपस्थित होते.

# जागरूक शेतकरी – सुरक्षित फवारणी.!

शेती करताना कीड नियंत्रणासाठी किटकनाशकांचा वापर अपरिहार्य असतो. मात्र त्याचा वापर करताना शेतकऱ्यांनी योग्य ती काळजी घेतली नाही, तर याचे दुष्परिणाम आरोग्यावर होऊ शकतात. अनेकदा फवारणी करताना साध्या चुकांमुळे विषबाधा होऊन अपघात किंवा आजार उद्भवतात. त्यामुळे किटकनाशके फवारण्यापूर्वी, फवारताना आणि फवारणीनंतर काही महत्त्वाच्या गोष्टी लक्षात ठेवणे अत्यावश्यक आहे.

फवारणी करण्याआधी वापरण्यात येणाऱ्या रसायनाच्या बाटलीवरील लेबल, सूचना पत्रक नीट वाचावे. त्या प्रत्येक रासायनाच्या विषारीपणाची पातळी वेगळी असते. यासाठी बाटल्यांवर लाल, पिवळा, निळा आणि हिरवा अशा रंगाचे त्रिकोणी चिन्ह असते. लाल रंग हे अत्यंत विषारी रसायन दर्शवते. या रंगांच्या आधारे निरक्षर व्यक्तीलाही त्या किटकनाशकाचे स्वरूप लक्षात येते.

फवारणीसाठी वापरण्यात येणारे यंत्र हे योग्य स्थितीत असावे. पंपाचे नोझल गळके असेल तर त्याचा वापर करणे टाळावे. तणनाशकासाठी वापरलेला पंप कीटकनाशकासाठी वापरू नये. मिश्रण तयार करताना सुरुवातीला थोड्या पाण्यात भुकटी मिसळून मग गरजेनुसार पाणी टाकावे. हे करताना हातात हातमोजे व तोंडाला मास्क लावणे आवश्यक असते. शरीर झाकलेले राहील अशा प्रकारचे कपडे वापरावेत. डोक्यावर कापड, पायात बूट आणि पूर्ण बाह्यांचे शर्ट, पायजमा वापरणे फायदेशीर ठरते.




फवारणी करताना वाऱ्याच्या दिशेनेच फवारणी करावी. पावसाच्या वेळी किंवा पाऊस होण्याची शक्यता असताना फवारणी करू नये. फवारणीनंतर लगेच शेतात प्रवेश करणे टाळावे. फवारणी करत असताना खाणे, पिणे किंवा धूम्रपान करणे टाळावे. एक दिवसात सलग ८ तासांपेक्षा जास्त फवारणीचे काम करू नये आणि उपाशीपोटी फवारणी करणे आरोग्यदृष्टीने धोकादायक असते. सकाळी न्याहारीनंतरच हे काम करावे.

फवारणी झाल्यावर हात, पाय, चेहरा आणि इतर अंग साबणाने स्वच्छ धुवून घ्यावा. वापरलेले कपडे वेगळे ठेवावेत. वापरलेले साहित्य स्वच्छ करून सुकवून सुरक्षित स्थळी ठेवावे. हे साहित्य विहिरी, नदी किंवा ओढ्याजवळ धुणे टाळावे. वापरलेले पाणी पडिक जागी टाकावे. रिकाम्या बाटल्या जमिनीत पुराव्यात.

विषबाधा झाल्यास थोड्याच वेळात काही लक्षणे दिसून येतात – जसे की चक्कर येणे, उलटी होणे, डोळ्यांतून पाणी येणे, अंगावर चट्टे उठणे, डोळे अंधुक दिसणे, स्नायूंमध्ये वेदना होणे, किंवा बेशुद्ध होणे. अशी लक्षणे दिसताच रुग्णास त्वरित नजीकच्या दवाखान्यात नेणे आवश्यक आहे. डॉक्टरांना नेमके कोणते किटकनाशक वापरले गेले होते, किती प्रमाणात आणि किती वेळापूर्वी हे घडले, याची माहिती दिल्यास उपचार अधिक योग्य प्रकारे करता येतात.

विषबाधा झाल्यावर रुग्ण पूर्ण शुद्धीत असेल तरच त्याला उलटी करण्यास प्रवृत्त करावे. अन्यथा तसे करू नये. कधीकधी प्राथमिक उपचार म्हणून कोळशाची भुकटी पाण्यात मिसळून दिली जाते. परंतु हेही डॉक्टरांच्या मार्गदर्शनानुसारच करावे.

शेतीच्या आधुनिक काळात रसायनांचा वापर अपरिहार्य असला, तरी सुरक्षिततेच्या दृष्टीने खबरदारी घेणे हे शेतकऱ्यांच्या आणि त्यांच्या कुटुंबाच्या आरोग्यासाठी अत्यंत महत्त्वाचे आहे. त्यामुळे प्रत्येक शेतकऱ्याने किटकनाशक वापरताना योग्य ती दक्षता घ्यावी, यासाठीच ही माहिती सर्वांना समजून घेणे गरजेचे आहे.

## देवेंद्र फडणवीसांनी धनगर समाजाला न्याय द्यावा–हेमंत पाटील

पुणे,–केंद्रीय पुरातत्व विभागाने रायगडावर वास्तव्याला असलेल्या रहिवाश्यांना परिसर खाली करण्याची नोटीस दिली आहे. धनगर वस्तीतील नागरिकांना त्यामुळे पिढीजात जागा सोडण्याची वेळ आली आहे. परंतु,या मुद्द्यावर राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी तात्काळ योग्य तोडगा काढत धनगर समाजाला न्याय द्यावा,अशी विनंती इंडिया अगेन्स्ट करप्शनचे राष्ट्रीय अध्यक्ष आणि ओबीसी नेते हेमंत पाटील यांनी मंगळवारी (ता.१०) केली.



रायगड हा ऐतिहासिक वारसास्थळ म्हणून संरक्षित आहे.एएसआयच्या नियमानुसार गडावरील कुठलेही अतिक्रमण, नवीन बांधकाम बेकायदेशीर असल्याने धनगर वस्तीतील नागरिकांना नोटीस बजावण्यात आल्या आहेत.७ पिढ्यांपासून गडावर वास्तव्य असलेल्या धनगर बांधवांवर त्यामुळे बेघर होण्याची वेळ आली आहे.केंद्र सरकार सोबत यासंदर्भात फडणवीस यांनी चर्चा करीत विशेष बाब म्हणून धनगर वस्ती कायम ठेवण्यासाठी सकारात्मक प्रयत्न करावे,अशी विनंती पाटील यांनी केली. हिंदवी स्वराज्याचे संस्थापक, जाणता राजा छत्रपती शिवाजी महाराज यांच्या न्यायाने गरीब बांधवांना सरकारने न्याय द्यावा,असे आवाहन पाटील यांनी केले.

रायगडावर बाजारपेठ जगदीश्र्वर मंदिराच्या खालच्या परिसरात धनगर बांधवांची घरे आहेत.गडावर येणाऱ्या पर्यटक, शिवप्रेमींना दूध, दही, ताक, नाश्ता, जेवण देऊन ह कुटुंबीय उदरनिर्वाह करतात.गेल्या ७०० वर्षांपासून धनगर समाज गडावर वास्तव्याला आहे. स्वराज्यासाठी शिवकार्यात धनगर समाजाने देखील शौय गाजवले आहे. गडाचे संरक्षण, शिवकाळात पशुपालन, दूध उत्पादनासह स्वराज्याची लढाई लढण्याचे कार्य समाजाने केले आहे. अशात केवळ गरिबांची झोपडी अतिक्रमण म्हणून काढून घेऊ नाही,असे मत पाटील यांनी व्यक्त केले.

इतर गडावर असलेले अतिक्रमण सरकारने खुशाल काढावे, मात्र धनगर वस्तीला विशेष बाब म्हणून वास्तव्याची परवानगी द्यावी, अशी मागणी पाटील यांनी केली.धनगर आणि ओबीसी नेत्यांनी या मुद्द्यावर एकत्रित येऊन केंद्र सरकार सोबत पत्रव्यवहार करीत धनगर वस्ती वाचवण्यासाठी प्रयत्न केले पाहिजे. लवकरच पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना यांसदर्भात पत्र पाठवत धनगर वस्ती कायम ठेवण्याची विनंती करणार असल्याचे पाटील म्हणाले

## वड पौर्णिमा निमित्ताने ७६ मोठी झाडे लावली,आमचं ग्रीन लातूर वृक्ष फाऊंडेशन चा उपक्रम.

लातूर –सिद्धेश्र्वर रस्त्यावर वड, पिंपळ,



उंबर, कडूनिंब, बहावा, काशीद ची ७६ झाडे लावण्यात आली. सोबतच आमचं ग्रीन लातूर वृक्ष फाऊंडेशन च्या माध्यमातून १०० वडाच्या झाडांचे मोफत वितरण करण्यात आले.

याबरोबरच उपस्थित वृक्ष प्रेमींना वडाच्या झाडाचे फायदे विषद करण्यात आले. हे झाड अनेक प्रकारच्या रोगांवर उपचार करण्यासाठी वापरले जाते. वडाच्या झाडाची मुळे, पाने, साल आणि चीक यांचा उपयोग औषध म्हणून केला जातो. वडाचे झाड धार्मिक आणि सांस्कृतिकदृष्ट्या देखील महत्त्वाचे आहे.

वडाच्या झाडाचे औषधी उपयोग:रोग प्रतिकारशक्ती वाढवते.वातविकार कमी करते केसगळती थांबवते:वडाच्या पारंब्यांचे तेल केसगळती थांबवण्यासाठी आणि केस वाढवण्यासाठी मदत करते.

जखमा भरून काढते:वडाच्या चिकाचा उपयोग जखमा भरून काढण्यासाठी केला जातो.

दात आणि हिरड्यांचे आरोग्य सुधारते:वडाची मुळे, पारंब्या चावून चावल्याने दात किडणे, हिरड्यांचे आजार आणि हिरड्यांमधून रक्त येणे टाळता येते.

वटवृक्ष: वडाचे झाड हिंदू धर्मात 'वटवृक्ष' म्हणून ओळखले जाते आणि त्याची पूजा केली जाते.

वटपौर्णिमा: वटपौर्णिमेच्या दिवशी स्त्रिया वडाची पूजा करतात आणि पतीच्या दीर्घायुष्यासाठी प्रार्थना करतात. अक्षयवृक्ष: वडाला 'अक्षयवृक्ष' असेही म्हटले जाते, कारण हे झाड कधीही नष्ट होत नाही आणि ते नेहमी वाढतच राहते.

अमरत्व आणि ज्ञान: वडाचे झाड अमरत्व, आध्यात्मिक ज्ञान आणि ज्ञानाचे प्रतीक मानले जाते. याप्रमाणे वडाचे झाड अनेक प्रकारे उपयुक्त आहे. औषधी, धार्मिक आणि सांस्कृतिकदृष्ट्या त्याचे महत्त्व आहे.

म्हणून प्रत्येकाने आपल्या आयुष्यात एक दोन वडाची झाडे लावून जोपासायला हवी असे आवाहन आमचं ग्रीन लातूर वृक्ष फाऊंडेशन सदस्यांनी केले.हा उपक्रम यशस्वी करण्यासाठी आमचं ग्रीन लातूर वृक्ष फाऊंडेशन सदस्यांनी परिश्रम घेतले.

## माझ्यावर हल्ला झाल्यास अजित पवार जबाबदार; राष्ट्रवादीच्या पदाधिकाऱ्यांकडून धमक्या, लक्ष्मण हाकेंचा संताप

मुंबई–ओबीसी आरक्षण नेते लक्ष्मण हाके आणि राष्ट्रवादीतील वाकयुद्ध सुरुच असून गेल्या काही दिवसांपासून लक्ष्मण हाके चर्चेत आहेत. आंदोलक लक्ष्मण हाके यांनी काही दिवसांपूर्वी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यावर जोरदार हल्लाबोल केला होता. अजित पवार यांनी सामाजिक न्याय विभागाचा निधी वळवल्याचे सांगत गंभीर आरोपही केले होते. त्यानंतर राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या पदाधिकारी व आमदारांनी लक्ष्मण हाकेंवर पलटवार केला. आमदार अमोल मिटकरी यांनी काही शब्दप्रयोग करत हाकेंना लक्ष्य केलं. दरम्यान, आजही त्यांनी उपमुख्यमंत्री अजित पवारांवर निशाणा साधला आहे. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचा २६ वा वर्धापन दिन आहे. यातच आता लक्ष्मण हाके यांनी एक पोस्ट चांगलीच चर्चेत आली आहे. या पोस्टची चर्चा असतानाच राष्ट्रवादीच्या पदाधिकाऱ्यांकडून मिळणाऱ्या धमक्यांवरून ओबीसी आंदोलक लक्ष्मण हाके यांनी माझ्या केसाला जरी धक्का लागला तरी त्यास पवार कुटुंबीय अजित पवार आणि रोहित पवार जबाबदार असतील असा थेट इशाराच दिलाय.

काय म्हणाले लक्ष्मण हाके?

मला रोज महाराष्ट्रातून राष्ट्रवादीच्या पदाधिकाऱ्यांचे धमक्या मिळू लागल्या असून मी गावगाड्यातील मेंढपाळाचा पोरगा आहे मी अशा धमक्यांना भी घालत नाही मात्र माझ्या केसाला जरी धक्का लागला तरी त्यास पवार कुटुंबीय अजित पवार आणि रोहित पवार जबाबदार असतील असा इशारा ओबीसी नेते लक्ष्मण हाके यांनी दिला आहे. हाके यांना राष्ट्रवादीच्या विविध पदाधिकाऱ्यांकडून धमकीचे फोन आणि इशारे येऊ लागले असून यासंदर्भात पोलिसांकडूनही गृह विभागाकडे अहवाल गेल्याचे हाके यांनी सांगितले. ते म्हणाले, अजितदादा तुमच्या पिसाळलेल्या कुर्त्यांना आवर घाला. जर माझ्या केसाला धक्का लागला तर तुम्हाला रस्त्यावर आणू. माझ्या केसाला जरी धक्का लागला तर त्याला पवार कुटुंब अजित पवार, रोहित पवार जबाबदार राहतील असा इशारा लक्ष्मण हाकेंनी दिलाय.

मी गोरगरीब ओबीसी समाजासाठी आणि त्यांच्या हक्क अधिकारांसाठी लढत असून अर्थ खात्याला गोचीडासारखा चिटकून बसलेला अजित पवार हा ओबीसी समाजाचा निधी देत नसल्याने माझा त्यांच्याशी वाद आहे. मात्र ओबीसी समाजाचा अडवलेला निधी देण्याऐवजी राष्ट्रवादीचे पदाधिकारी नागपूर पासून पंढरपूर पर्यत ज्या पद्धतीने तिच्या देऊ लागली आहेत ते पाहता माझ्यावर असा हल्ला झाल्यास या संपूर्ण पवार कुटुंब जबाबदार असेल असा इशारा हाके यांनी दिला आहे.

## वाकलेल्या तारा व खांब दुरुस्त करून महावितरणने काही तासातच वीजपुरवठा सुरळीत केला

लातूर (प्रतिनिधी):लातूर शहर आणि परिसरात शनिवार, ८ जून रोजी रात्री आलेल्या वादळी वारे,पाऊस आणि विजेच्या कडकडाटामुळे जनजीवन विस्कळीत झाले. याच दिवशी रात्री १२ वाजल्यानंतर आलेल्या वादळी वाऱ्यामुळे प्रभाग क्रमांक १५ मधील कानडे हॉस्पिटल परिसरात श्री. अंधोरीकर यांच्या घरावर जवळपास २५ ते ३० फूट लांबीची मोठ्या झाडाची फांदी पडली. यामुळे वीजपुरवठा खंडित झाला आणि ही फांदी चौकातील रस्त्यावर पडल्याने वाहतूकही ठप्प झाली होती. माजी मंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांच्या कार्यालयातील पाठपूरावामुळे वाकलेल्या तारा व खांब दुरुस्त करून महावितरणने काही तासातच वीजपुरवठा सुरळीत केला. वादळी पावसामुळे निर्माण झालेल्या या आपत्कालीन परिस्थितीची माहिती मिळताच, राज्याचे माजी वैद्यकीय शिक्षण व सांस्कृतिक कार्यमंत्री आणि लातूर जिल्ह्याचे माजी पालकमंत्री तसेच महाराष्ट्र विधिमंडळ काँग्रेस पक्षाचे मुख्य प्रतोद, आमदार अमित विलासराव देशमुख यांच्या कार्यालयाने जराही वेळ न घालवता तात्काळ महावितरण विभाग आणि संबंधित अभियंत्यांशी संपर्क साधला. या परीस्थीतीची माहीती दिली, महावितरणने तातडीने रात्रीपासूनच सुरक्षिततेच्या दृष्टीने काही आवश्यक ठिकाणी वीजपुरवठा बंद ठेवला होता.



रविवार, ९ जून रोजी सकाळी सहा वाजता आमदार देशमुख यांच्या कार्यालयाने पुन्हा एकदा महावितरण आणि मनपा प्रशासनाशी संपर्क साधून यावर तातडीने कार्यवाही करण्याची विनंती केली. आमदार देशमुख यांच्या पाठपुराव्यामुळे मनपा आणि महावितरण प्रशासनाने तत्परतेने पाऊले उचलली. मनपा प्रशासन, अग्निशमन दल आणि महावितरण यांनी एकत्रितपणे केलेल्या प्रयत्नांमुळे झाडाच्या पडलेल्या फांद्या पूर्णपणे बाजूला करण्यात आल्या. यामुळे सदरील रस्ता वाहतुकीसाठी त्वरित मोकळा झाला. तसेच वाकलेल्या तारा व खांब दुरुस्त करून महावितरणने काही तासातच वीजपुरवठा सुरळीत केला. आता प्रभाग क्रमांक १५ मधील वीजपुरवठा पूर्णपणे सुरळीत झाला आहे. आमदार अमित विलासराव देशमुख यांनी या संकटकाळात तातडीने कार्यवाही करण्यासाठी केलेल्या मदतीबद्दल परिसरातील नागरिकांनी त्यांचे मनापासून आभार मानले आहेत. त्यांच्या प्रयत्नांमुळे परिसरातील नागरिकांना मोठा दिलासा मिळाला आहे.

## राशिभविष्य ११ जून २०२५

मेष : शुभ रंग: केसरी,शुभ दिशा: पश्चिम

नवीन योजना कार्यान्वयीत होईल. कौटुंबिक वातावरण चांगले राहणार आहे. आर्थिक आवक वाढेल परंतु जास्त अपेक्षा धरू नका. व्यापारात फायदा मिळण्याची परिस्थिती निर्माण होईल.

वृषभ : शुभ रंग:निळा, शुभ दिशा: उत्तर

व्यापारात अडचणी निर्माण होतील. त्यामुळे आजचा दिवस धावपळीत जाणार आहे. मेहनतीच्या मानाने आज कमी आवक राहणार आहे. खर्च कमी करा. मुलांच्या व्यवहारामुळे मानसिक तणाव राहील.

मिथुन : शुभ रंग: काळा,शुभ दिशा: दक्षिण

वरिष्ठ लोकांमध्ये मान सन्मान मिळेल. बुद्धी चातुर्यामुळे कामात यश मिळेल. नवीन गुंतवणूक करण्याचे योग आहेत. आपल्या व्यसनांवर नियंत्रण ठेवा.

कर्क : शुभ रंग: पिवळा, शुभ दिशा: दक्षिण

विचार पूर्वक काम केल्यास आर्थिक स्थिती सुधारण्यास मदत होईल. व्यवसाया निमित्ताने झालेला प्रवास लाभदायक राहील. मुलांच्या कामाबल आनंदी रहाल.

सिंह : शुभ रंग: जांभळा,शुभ दिशा: उत्तर

व्यावसायीक किंवा कौटुंबिक समस्यांचे समाधान होईल. कौटुंबिक चिंता दूर होईल. कोणाचाही द्वेष करू नका. विद्यार्थ्यांना परिक्षेत अपेक्षीत यश मिळेल.

कन्या : शुभ रंग: पांढरा, शुभ दिशा : उत्तर

आपल्या बुद्धी चातुर्याने समस्या दूर होतील. सुख समृध्दीत वाढ होईल. उतावेळपणा करू नका. वाचनाची गोडी वाढेल. प्रवास करण्याचे शक्यतो टाळा.

तुळ : शुभ रंग: लाल, शुभ दिशा: उत्तर

मित्र, शुभचिंतकाची भेट होईल. आई वडिलांच्या प्रकृतीची काळजी घ्या. गृहपयोगी वस्तू खरेदी करण्याचे योग आहेत. व्यापार व्यवसाय चांगला चालेल. बोलण्यावर नियंत्रण ठेवा.

वृश्चिक : शुभ रंग: हिरवा, शुभ दिशा:उत्तर

आर्थिक स्थिती मजबूत होईल. मुलांच्या आरोग्याची चिंता मिटणार आहे. काही नवीन योजना बनवताल. रागावर नियंत्रण ठेवणे आवश्यक आहे. वाहन सुख मिळेल.

धनु : शुभ रंग :गुलाबी,शुभ दिशा:उत्तर

वाद विवादापासून दूर रहा. व्यापारात लक्ष घालावे लागेल. वेळेवर निर्णय न घेतल्यामुळे नुकसान होण्याची शक्यता आहे. धार्मिक भावना वाढीस लागेल.

मकर: शुभ रंग : केसरी, शुभ दिशा: पश्चिम

व्यवहारात कुशलतेमुळे आधिकारी वर्गाकडून स्तुती होईल. आर्थिक लाभ मिळेल. अनोळखी व्यक्तीवर विश्वास ठेवू नका. मुलांच्या आरोग्याच्या तक्रारी दूर होतील.

कुंभ : शुभ रंग :निळा, शुभ दिशा :पश्चिम

व्यवसायात यश मिळेल. दूरदर्शीपणामुळे अनेक अडचणींना व्यवस्थीत हाताळाल.खर्च कमी करण्याचा प्रयत्न करा. धार्मिक भावना वाढीस लागेल.व्यापार चांगला चालेल.

मीन : शुभ रंग: हिरवा, शुभ दिशा: पश्चिम

अडकलेली कामे पूर्ण होण्याचे योग आहेत. मान प्रतिष्ठा सन्मान मिळणार आहे. जोखमीच्या कामापासून दूर रहा. बोलण्यावर नियंत्रण ठेवा.

## इतिहासात आजचा दिवस ११ जून २०२५

अंतरराष्ट्रीय

१९३८ – बेलज्यीअममध्ये भूकंप.

१९७५ – पाकिस्तानी क्रिकेटपटू जावेद मियाँदादचे १७ वर्ष ३६४ दिवस वयात एकदिवसीय आंतरराष्ट्रीय क्रिकेट मध्ये पदापर्ण.

१९९१ – मैक्रोसॉफ्टने एमएस डॉस ५.० लांच केले.

१९९४ – मोशुद अबीओला नायजेरियाचे राष्ट्रपती बनले.

२००८ – दक्षिण ते उत्तर अमेरिका, युरोप व आफ्रिका या खंडांनामधून एकाचवेळी आकाशाचा एकाच भागाचे निरीक्षण करता यावे यासाठी जगातील सर्वात मोठे टेलिस्कोपचे जाळे यशस्वीरित्या कार्यान्वित झाले.

राष्ट्रीय

२००६ – 'पृथ्वी' या देशाच्या अत्याधुनिक आणि जमिनीवरुन जमिनीवर मारा करणाऱ्या क्षेपणास्त्राची चांदीपूर रेजहून यशस्वी प्रायोगिक चाचणी करण्यात आली.

२००७ – मल्लिका शेरावतने आशियाच्या शंभर सुंदर जणांच्या यादीत स्थान मिळवले.

२००८ – जगातील २५ संस्थांपैकी ३ भारतीय संस्था पीपल लाइक अस (प्लस) , संघमित्रा आणि संकल्प यांना 'रेड रिबन' पुरस्कार जाहीर झाला.

जन्म

१९२० – नेपाळचे राजा बीर बीक्रम शाह देवा महेंद्रा यांचा जन्म.

१९३५ – पाकिस्तानी क्रिकेटपटू शेख फजलुर रहेमानचा जन्म.

१९४७ – रेल्वे मंत्री व राजद नेते लालू प्रसाद यादव यांचा जन्म.

१९५१ – वेस्टइंडीजच्या क्रिकेटपटू कोलीस किंगचा जन्म.

निधन

१९२४ – इतिहास संशोधक व नाटककार वासुदेवशास्त्री खरे यांचे निधन.

१९५० – बालसाहित्यिक, समाजवादी नेते आणि स्वातंत्र्य सैनिक पांडुरंग सदाशिव साने ऊर्फ साने गुरूजी यांचे निधन.

१९८३ – नामवंत उद्योगपती घन–श्याम बिर्ला यांचे निधन.

२००० – काँग्रेसचे ज्येष्ठ नेते आणि माजी केंद्रीय मंत्री राजेश पायलट यांचे निधन.

हे पत्रक, मालक, संपादक, प्रकाशक रघुनाथ बनसोडे यांनी मुद्रक महेश मोतीराम राठोड यांनी मयूर ऑफसेट प्रिंटर्स, मेन रोड, मित्र नगर, लातूर, जि.लातूर - ४१३ ५१२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक लातूर प्रभात, पवन कॉलनी, कृपासदन शाळेजवळ, लातूर (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.
संपादक - रघुनाथ वाघोजी बनसोडे, मो.८८३०२५०६४५
(पी.आर.बी.कायद्यानुसार संपादकाची जबाबदारी)
RNI No.: - MAHMAR/2017/72894